।। ज्ञानदीप लावू जगी ।।

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,

॥ ज्ञानदीप लावू जगी ॥

स्थापना-१ जुलै १९९८

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे - ४२४३०४


Website : www.admsps.org

Email : principal.admsps@yahoo.co.in


UGC 2(F), 12(B) & Permanently Affiliated to K.B.C. N.M.U., Jalgaon

NAAC “B” Grade (2.41 CGPA)

# माहिती पत्रक

सन २०२३-२०२४





स्व. आईसो.
डॉ. उषाताई रामचंद्र देवरे

# आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळे

(नोंदणी क्र. महाराष्ट्र/३५६९/धुळे, दि. २०.७.१९९५)
(ट्रस्ट नोंदणी क्र. ३२९३/धुळे, दि. २८.११.१९९५)

## स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे

संस्थापक अध्यक्ष

## * संचालक मंडळ *

| अ. क्र. | संचालकांचे नाव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. दादासो. डॉ. संजय रामचंद्र देवरे | अध्यक्ष |
| २ | श्री. आबासो. राजाराम माणिक देवरे | उपाध्यक्ष |
| ३ | सौ. ताईसो. डॉ. संजीवनी संजय देवरे | सचिव |
| ४ | सौ. ताईसो. डॉ. सुजाता सुनिल सोनवणे | खजिनदार |
| ५ | श्री. आण्णासो. विश्वासराव राजाराम देवरे | संचालक |
| ६ | श्री. नानासो. सुभाष शंकर देवरे | संचालक |
| ७ | ताईसो. डॉ. भारती पांडुरंग बागुल | संचालिका |
| ८ | श्री. नंदकिशोर आनंदराव देवरे | संचालक |
| ९ | श्री. कुणाल संजय देवरे | संचालक |
| १० | डॉ. रोहन सुनिल सोनवणे | संचालक |
| ११ | प्रा. डॉ. शिवाजी बन्सीलाल पाटील | संचालक |
| १२ | श्री. विलासराव निळकंठ पाटील | संचालक |
| १३ | सौ. भाग्यश्री कुणाल देवरे | संचालक |
| १४ | चि. दर्शन सुनिल सोनवणे | संचालक |

।। ज्ञानदीप लावू जगी ।।

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे - ४२४३०४

Website : www.admsps.org

Email : principal.admsps@yahoo.co.in

कवयित्री बाहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्न

विद्यापीठाचा विद्यार्थ्यांसाठी हेल्पलाईन नंबर ०२५७-२२५८४१८

Email : sfc@nmuj.digitaluniversity.ac

UGC 2(f), 12(B) & Permenently Affiliated to K.B.C. N.M.U. Jalgaon

**NAAC "B" Grade (2.41 CGPA)**

# माहिती पत्रक

## सन २०२३-२०२४

प्रो. संजीव भ. गिरासे

प्राचार्य

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे


| | | |
|---|---|---|
| | महाविद्यालयाचे दृष्टी, ध्येय व उद्देश | 03 |
| 1 | प्रस्तावना | 05 |
| 2 | प्रवेशासाठी नियम, अटी व निवडावयाचे विषय | 07 |
| 3 | विद्यार्थ्यांचे सत्र मंजूर होणेसाठीचे नियम व अटी | 10 |
| 4 | इतर नियम व अटी | 11 |
| 5 | मागासवर्गीय शिष्टीवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना सूचना | 12 |
| 6 | प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे | 12 |
| 7 | फि संबंधीचा तक्ता | 14 |
| 8 | प्राध्यापक वृंद | 15 |
| 9 | शिक्षकेतर कर्मचारी वृंद | 16 |
| 10 | विद्यापिठाच्या विद्यार्थ्यांसाठी विविध योजना | 17 |


***Sexual harassment at work place of woman is a crime ... crime... crime...***

# Vision (दृष्टी)

*"To provide higher education stream to the first generation up to the grass root society of rural and hilly area developing human values and pursuit responsible, secular, democratic, citizens of healthy minds/ nature."*

"उच्च शिक्षणाची ज्ञानगंगोत्री ग्रामीण व डोंगरी भागातील समाजातल्या प्रथम पिढीच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचून मानवी मूल्य विकसित करुन सुजाण, धर्मनिरपेक्ष, लोकशाहीवादी, राष्ट्रप्रेमी, निरोगी मनाचे नागरिक घडविणे."

# Mission (ध्येय)

1) *To bring maximum students in the main stream of higher education through innovative ideas with globle vision.*
   नाविन्यपूर्ण/नवीन उपक्रमाद्वारे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना जागतिक दृष्टीकोनासह उच्चशिक्षणाच्या प्रवाहात आणणे.

2) *All round personality development of the student by arts, science, social science and technology.*
   कला, विज्ञान, सामाजिक शास्त्र व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास साधणे.

3) *To make quality affordable and accessible higher education to student in the rural and hilly area.*
   ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाची सोय सुलभतेने उपलब्ध करुन देणे.

# Objectives (उद्दीष्टये)

1) *Provide value and need based education.*
मूल्य व गरजांवर आधारीत शिक्षण देणे.

2) *To encourage skills in students to enable them to face the changing educational atmosphere.*
विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यास उत्तेजन देणे व बदलत्या शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेण्याची क्षमता निर्माण करणे.

3) *Gurantee of equal educational apportunity without any discrimination to race, religion, caste, gender, sect, colour and disability.*
वंश, धर्म, जात, लिंग, पंथ, रंग व विकलांगता यावर भेदाभेद न करता सर्वांसाठी समान शिक्षणाची हमी.

4) *To creat condition in which staff and student can achieve their full potential.*
कर्मचारी व विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा पूर्णपणे वापर करण्यासाठी परिस्थिती निर्माण करणे.

5) *To stimulate the sense of environment among the students and soceity.*
विद्यार्थी व समाज यांची पर्यावरणाविषयी जागृती करणे.

6) *To eradicate the inferior complex in the mind of rural and hilly area students by imparting them higher education.*
ग्रामीण व डोंगरी भागातील विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंडाची भावना उच्च शिक्षणाने नष्ट करणे.

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# स्वर्गीय आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे

(उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव संलग्न)

# माहिती पत्रक

## प्रस्तावना :-

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

आपल्या उच्च शिक्षणासाठी आपण स्व. आण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालयाची निवड केली त्याबद्दल आपले अभिनंदन.

म्हसदीसारख्या डोंगराळ व दुष्काळग्रस्त भागात (१६ गाव काटवण) उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेऊन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षि स्व. प्राचार्य आण्णासाहेब आर. डी. देवरे यांच्या कुशल व संघटीत नेतृत्वाखाली दिनांक २० जुलै १९९५ रोजी आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्था, धुळे या संस्थेचा पाया रचण्यात आला. या संस्थेच्या विद्यमाने १ जुलै १९९८ रोजी म्हसदी ग्रामपंचायतीच्या लहानशा खोलीत सुरू होऊन आज रोजी डोंगराच्या पायथ्याशी निसर्गरम्य वातावरणात महाविद्यालय दिमाखाने उभे आहे.

आमचे महाविद्यालय उ. म. वि. जळगांवशी कायम संलग्न असून विद्यापीठ अनुदान आयोगाचा २(फ) व १२(ब) दर्जा प्राप्त आहे. नुकतेच नॅक बेंगलोरने ब दर्जा दिलेला आहे. कला व विज्ञान शाखेत पदवी पर्यंत उत्तम शिक्षण दिले जाते. अभ्यासक्रम, परीक्षा पद्धती, प्रमोशन पद्धती, प्रवेश व पात्रता, आकारावयाचे शुल्क इत्यादी सर्व बाबी विद्यापीठाच्या नियमानुसार राबविण्यात येतात.

आमच्या महाविद्यालयात ''विद्यार्थी हा आमचा केंद्रबिंदु आहे.'' म्हणूनच जागतिकीकरणाचा वेग आणि उच्च शिक्षणाची परीस्थिती डोळ्यासमोर ठेवून आर्थिक, मनुष्यबळ, व्यवस्थापन, संघटन, सहिष्णुता, देशप्रेम, सामाजिक बांधीलकी व माणुसकीची संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविली जाते.

आमच्या महाविद्यालयातील एकुणच वातावरण आपापसात समन्वय व विश्वास राखणारे आहे. आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय यंत्रणा व संचालक मंडळ यांचे सर्वसमावेशक कुटुंबच आहे. म्हणून आम्ही आमची आदिशक्ती धनदाई असे अभिमानाने म्हणतो.

- आम्ही सामाजिक विकासाची बांधीलकी स्विकारुन विद्यार्थ्यांची स्वयंसेवी संघटना निर्माण करुन ग्रामीण विकास, आरोग्य, स्वच्छता, अंधश्रध्दा निर्मुलन, ज्ञान विज्ञानाचा प्रसार, मुलींसाठी शिक्षणाचे महत्व यासारखे उपक्रम राबवित आहोत.
- विविध विषयांवरील चर्चासत्रे, कार्यशाळा, परीषदा, सहली व सांस्कृतिक मूल्य यासारख्या विद्यार्थीभिमूख कार्यक्रमाद्वारे प्राध्यापक व विद्यार्थी यांचा उत्साह संवर्धीत होत असतो.
- राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) चे कार्यक्रम वर्षभर सुरू असतात. त्याद्वारे उद्याचे सुसंस्कृत नागरिक

घडविण्यासाठी विद्यार्थ्यांचे विविध उपक्रमाद्वारे प्रबोधन केले जाते.

* जीवनासाठी असलेली मूल्ये, संवेदनशिलता, सौंदर्यशिलता, विनम्रता, आई-वडील व थोरल्या मोठ्यांचा आदर करणे या गुणांची जोपासना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून केली जातात.
* आर्थिक दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना विविध माध्यमातून आर्थिक मदत केली जाते. तसेच उ.म.वि. च्या सहकार्याने 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजना महाविद्यालयात राबविली जाते.
* जागतिक नैसर्गिक आपत्ती काळात आमचे विद्यार्थी कटाक्षाने युध्दपातळीवर मदत करीत असतात.
* निसर्गरम्य ठिकाणी महाविद्यालयाची प्रशस्त इमारत असून विद्यार्थी हित जोपासणारे उच्च शिक्षित अनुभवी व कार्यक्षम संचालक मंडळ आहे. सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय, मैदानी खेळकरीता भव्य प्रांगण, तज्ञ व अनुभवी उच्च विद्याविभुषित प्राध्यापक, अनुभवी सुशिल शिक्षकेतर कर्मचारी वृंद लाभला आहे.
* प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांनी उभारलेल्या निधीतून स्व. प्राचार्य मा. आण्णासाहेब आर. डी. देवरे स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन विद्यापीठ स्तरावर सुरू करीत आहोत.
* सुचना पेटीवर ''विद्यार्थी शिक्षक पालक'' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.
* महाविद्यालयात मुला-मुलींसाठी स्वतंत्र वाचन कक्ष असून प्रथमोपचार सुविधा देखील उपलब्ध करुन दिलेली आहे.
* महाविद्यालयाच्या आवारात स्वतंत्र कॅन्टीनची व्यवस्था आहे.
* विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र संगणक कक्ष सुरु केला आहे.
* विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा, प्रदर्शने यांचे आयोजन होत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञान व अनुभवाचा वसा रुजविण्यासाठी विविध सहलींचे आयोजन केले जाते.
* शैक्षणिक, क्रिडा, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात नैपुण्यप्राप्त विद्यार्थ्यांसाठी विविध पारितोषिके व शिष्यवृत्ती दिल्या जातात.
* महाविद्यालय परिसरात स्वयंचलित सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्यात आलेले आहेत.
* मागासवर्गीय तसेच केंद्र सरकार व राज्य सरकारच्या सर्व शिष्यवृत्त्यांचा लाभ विद्यार्थ्यांना दिला जातो.
* विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा व व्यवसाय मार्गदर्शन केंद्र राबविले जाते.

**''माझ्या म्हसदी व पंचक्रोशीतील सर्व विद्यार्थी विविध क्षेत्रातील उच्च पदावर विभूषित व्हावेत, देश विदेशात त्यांचा सन्मान व्हावा व आदिशक्ती धनदाईचे नाव उज्वल व्हावे'' या मा. स्व. आण्णासाहेबांच्या व स्व. आईसाहेबांच्या स्वप्नपूर्तीसाठी महाविद्यालय सदैव तत्पर आहे.**

**प्रो. संजीव भ. गिरासे**
प्राचार्य

# प्रथम वर्ष प्रवेशासंबंधी नियम, अटी व निवडावयाचे विषय

## (अ) कला शाखा

### (१) प्रथम वर्ष कला (F.Y.B.A.)

१) महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही उच्च माध्यमिक बोर्डाची १२ वी कला, विज्ञान व वाणिज्य परीक्षा उत्तीर्ण झालेला विद्यार्थी प्रथम वर्ष कला वर्गाच्या प्रवेशासाठी पात्र आहे.

२) १७ नं. चा १२ वी परीक्षा फॉर्म भरुन बहिस्थ म्हणून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी प्रवेशास पात्र आहेत.

३) (अ) १२ वी पास होवून डी.एड्. झालेला विद्यार्थी तो इंग्रजीसह पास झालेला असल्यास प्रवेशासाठी पात्र राहील.

(ब) १० वी होवून डी.एड्. झालेला मात्र शिक्षण प्रशिक्षण मंडळाचे इंग्रजीसह परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अशा विद्यार्थ्याला मायग्रेशन सर्टिफिकेट सोबत जोडावे लागेल.

४) वरील शिवाय मा. विद्यापीठाने प्रथम वर्षात प्रवेशासाठी नमूद केलेला अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात चौकशी करुन त्या परीक्षा मंडळाची नावे जाणुन घ्यावी लागतील.

५) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परिपत्रकान्वये विविध शुल्कांची पुर्नरचना होवून सुधारीत शुल्क रचना लागू झाल्यास त्यानुसार होणारे बदल विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

६) प्रथम वर्ष कला व विज्ञान वर्गाच्या परीक्षा उ.म.वि. जळगांव यांच्या नियमानुसार होतील.

७) शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून प्रथम वर्ष कला वर्गाला CBSC पद्धत लागू करण्यात आली आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला नमूद केलेल्या खालील विषयापैकी सहा विषय निवडावे लागतील व सत्र पद्धतीत प्रत्येक विषयाचा पेपर १०० गुणांचा (६० गुण विद्यापीठ + ४० गुण अंतर्गत परीक्षा) असेल व वर्षभरात प्रत्येक विषयाचे दोन सत्र असतील. विषयांचे गट पुढीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| गट अ | सक्तीचे इंग्रजी |
| गट ब | मराठी |
| गट क | हिंदी |
| गट ड | अर्थशास्त्र/ऐच्छिक इंग्रजी |
| गट इ | राज्यशास्त्र/संरक्षणशास्त्र |
| गट फ | इतिहास |
| गट ग | भूगोल |

८) पर्यावरण शास्त्र विषय सर्वांसाठी सक्तीचा असून परीक्षा विद्यापीठाची ८० गुणांची व अंतर्गत प्रात्यक्षिक २० गुणांची राहील. सदर विषयाची परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षे बरोबर होईल.

९) गट अ मधील विषय सर्वांसाठी सक्तीचा आहे.

१०) राहीलेल्या प्रत्येक गटातून फक्त एक याप्रमाणे ५ विषय निवडता येतील.

११) ऐच्छिक इंग्रजी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यास मराठी/हिंदी यापैकी एकच भाषा घेता येईल.

१२) प्रथम वर्ष वर्गातील विद्यापीठ नियमानुसार वैद्यकीय तपासणी करुन घेणे आवश्यक आहे, तसे न केल्यास विद्यापीठ निकाल राखुन ठेवील.

**(२) द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)**

१) आपल्या महाविद्यालयात पुढीलप्रमाणे स्पेशल व जनरल विषय द्वितीय वर्ष कलासाठी शिकविले जातील.

सक्तीचा विषय :- इंग्रजी, MIL - Marathi / Hindi / English

स्पेशल (DSE) :- मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल

जनरल (DSC) :- मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, संरक्षणशास्त्र, इंग्रजी(ऐच्छिक)

प्रथम वर्ष कला वर्गात सर्व विषय उत्तीर्ण किंवा A.T.K.T. झालेल्या विद्यार्थ्यांना द्वितीय वर्ष कला वर्गात प्रवेश मिळेल. इंग्रजी स्पेशल घेणाऱ्या विद्यार्थ्याने प्रथम वर्ष कलासाठी ऐच्छिक इंग्रजी घेणे सक्तीचे असेल, द्वितीय वर्ष कला पासून घ्यावयाचे विशेष विषय निवडण्यासाठी प्रथम वर्ष कलासाठी विद्यार्थ्याने तो विषय घेतला असला पाहीजे.

द्वितीय वर्षासाठी एकुण ७ पेपर्स विद्यार्थ्यांनी द्यावयाचे असतात. द्वितीय वर्षासाठी प्रत्येकी एक पेपर सक्तीचा इंग्रजी व MIL असेल. द्वितीय वर्षासाठी पुढीलप्रमाणे अभ्यासक्रम विद्यार्थ्याला अभ्यासावयाचा आहे.

१) सक्तीचे इंग्रजी

२) MIL अनिवार्य

३) विद्यार्थ्याने घेतलेल्या स्पेशल विषयाचा पेपर (एस-१) DSE - 1

४) विद्यार्थ्याने घेतलेल्या स्पेशल विषयाचा पेपर (एस-२) DSE - 2

५) विद्यार्थ्याने घेतलेल्या स्पेशल विषयाचा जनरल विषयाचा पेपर (जी-२) DSC

६) स्पेशल विषयाखेरीज विद्यार्थ्याने दोन जनरल विषय निवडावेत.(प्रत्येकी एकाप्रमाणे दोन पेपर)(जी-२) DSC - 1

७) SEC - मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, भूगोल, संरक्षणशास्त्र (कोणताही एक)

<u>* विशेष सूचना :-</u>

१) शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० पासून द्वितीय वर्ष कला वर्गासाठी CBSC पद्धत लागू करण्यात आली आहे. प्रत्येक विषयासाठी एका सत्रात १०० गुणांची परीक्षा असेल. (६० गुण विद्यापीठ परीक्षा + ४० गुण अंतर्गत परीक्षा) वर्षभरात प्रत्येक विषयासाठी दोन सत्र असतील.

२) द्वितीय वर्ष कला वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी जनरल नॉलेज (सामान्यज्ञान) विषय सक्तीचा असून त्याच वर्षी विद्यापीठाची १०० गुणांची परीक्षा राहील.

**(३) तृतीय वर्ष कला (T.Y.B.A.)**

प्रथम वर्ष पास व द्वितीय वर्ष कला वर्गात दोन विषयांची A.T.K.T. मिळालेला विद्यार्थी तृतीय वर्ष कला वर्गाच्या प्रवेश ास पात्र राहील. द्वितीय वर्षात जे विषय असतील तेच विषय तृतीय वर्षासाठी घ्यावे लागतील.

१) सक्तीचे इंग्रजी - AEC

२) स्पेशल विषयाचा पेपर (एस-३) DSE

३) स्पेशल विषयाचा पेपर (एस-४) DSE

४) जनरल विषयाचा पेपर (जी-३) (घेतलेला स्पेशल विषय) DSC

५) स्पेशल विषयाखेरीज दोन जनरल विषयांचे पेपर (जी-३) DSC

६) GE-1 मराठी / हिंदी / इंग्रजी

७) GE-2 इतिहास / भूगोल

८) SEC - द्वितीय वर्षात अभ्यासलेला विषय.

* <u>विशेष सूचना :-</u>

१) शैक्षणिक वर्ष सन २०२०-२०२१ पासून तृतीय वर्ष कला वर्गासाठी CBCS पद्धत लागू करण्यात आली आहे. प्रत्येक विषयासाठी एका सत्रात १०० गुणांची परीक्षा असेल. (६० गुण विद्यापीठ परीक्षा + ४० गुण अंतर्गत परीक्षा) वर्षभरात प्रत्येक विषयासाठी दोन सत्र असतील.

**(ब) विज्ञान शाखा**

**(१) प्रथम वर्ष विज्ञान (F.Y.B.Sc.)**

१) विज्ञान वर्गात खाली निर्देश केल्याप्रमाणे चार विषय घेणे आवश्यक आहे. प्रत्येक विषयासाठी दोन थेअरी व एक प्रात्यक्षिक विषय राहील.

२) प्रथम वर्ष विज्ञान वर्गासाठी शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ पासून CBCS पद्धत लागू करण्यात आली आहे. प्रत्येक विषयासाठी एका सत्रात १०० गुणांची परीक्षा असेल. (६० गुण विद्यापीठ + ४० गुण अंतर्गत परीक्षा)

(अ) रसायनशास्त्र (ब) भौतिकशास्त्र/प्राणीशास्त्र

(क) वनस्पती शास्त्र (ड) भूगोल/गणित

(इ) MIL- Marathi / Hindi / English Or Enviroment अनिवार्य.

३) पर्यावरण शास्त्र विषय पहिल्या किंवा दुसऱ्या सत्रासाठी सक्तीचा असून परीक्षा विद्यापीठाची ८० गुणांची व अंतर्गत प्रात्यक्षिक २० गुणांची राहील. सदर विषयाची परीक्षा द्वितीय सत्रात शेवटी होईल.

४) रसायनशास्त्र विषय सर्वांसाठी सक्तीचा आहे.

५) गृप ब ते ड विषयापैकी कोणतेही तीन विषय घेता येतील.

**(२) द्वितीय वर्ष विज्ञान** (S.Y.B.Sc.)

**Group - A -** (1) Chemistry (2) Botany (3) Physics / Zoology (4) Geography / Mathematics (choose any Three)

**Group - B -** Marathi /English (choose any One)

**Group - C-** (SEC) - Chemistry / Botany / Physics / Zoology / Geography / Mathematics (choose any One)

**Group - D -** General Knowledge

१) प्रथम वर्ष विज्ञान वर्गात अभ्यासलेल्या विषयांपैकी कोणतेही तीन विषय घेता येतील व इंग्रजी किंवा मराठी पैकी कोणताही एक विषय घेणे आवश्यक आहे.

२) द्वितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी जनरल नॉलेज (सामान्यज्ञान) विषय सक्तीचा असून त्याच वर्षी विद्यापीठाची १०० गुणांची परीक्षा राहील.

३) द्वितीय वर्ष विज्ञान वर्गासाठी शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० पासून CBSC पद्धत लागू करण्यात आली आहे. प्रत्येक विषयासाठी एका सत्रात १०० गुणांची परीक्षा असेल. (६० गुण विद्यापीठ परीक्षा + ४० गुण अंतर्गत परीक्षा).

४) शैक्षणिक वर्ष सन २०१९-२० पासून द्वितीय वर्ष विज्ञान वर्गाच्या (CBSC) विद्यार्थ्यांसाठी सत्र चार करीता SEC (Skill Enhanecement Course) एक विषय घेणे बंधनकारक आहे.

**(३) तृतीय वर्ष विज्ञान** (T.Y.B.Sc.)

१) रसायन शास्त्र हा विषय विशेष स्तरावर अभ्यासता येईल. सदर विषय कायम विनाअनुदान तत्वावर सुरू करण्यात आलेला आहे. त्यासाठी योग्य ती फी भरावी लागेल.

२) तृतीय वर्ष विज्ञान वर्गासाठी सन २०२०-२१ पासून सत्र CBCS करण्यात आली आहे. प्रत्येक विषयासाठी प्रत्येक सत्रात १०० गुणांची परीक्षा असेल. (६० गुण विद्यापीठ परीक्षा + ४० गुण अंतर्गत परीक्षा)

## * सत्र (Term) मंजूरीसाठी महत्वाच्या अटी :-

केवळ महाविद्यालयात नाव दाखल केले व फी भरली म्हणजे सत्र मंजूर होत नाही. सत्र मंजूर होण्यासाठी पुढील गोष्टी आवश्यक आहेत

१) सर्व विषयांसाठी किमान ७५ % हजेरी.

२) प्रत्येक विषयासाठी नेमलेले स्वाध्याय प्रश्नांची उत्तरे समाधानकारक अभ्यासपूर्ण लिहून वेळेवर पूर्ण करणे.

३) सर्व अंतर्गत परीक्षांना बसून समाधानकारक प्रगती.

४) महाविद्यालयात, वर्गात व व्यतिरिक्त होणाऱ्या कार्यक्रमात सहभागी होणे.

५) वर्गात इतर कार्यक्रमाच्या वेळी वर्तन सभ्य व शिस्तप्रिय असावे.

६) या माहिती पत्रकात निर्देश केलेल्या परीक्षा पद्धतीच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या अटींचे पालन करणे.

७) प्रथम वर्ष कला व विज्ञान वर्गातील विद्यार्थ्यांसाठी वैद्यकिय तपासणी आवश्यक आहे.

८) प्रवेश घेतेवेळी फी भरल्याबद्दलची पावती घ्यावी. अन्यथा प्रवेश घेतल्याचे मान्य केले जाणार नाही.

## ⁕ महाविद्यालयाचे इतर नियम व अटी :-

**विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम :-**

१) प्रवेशाच्या वेळी सर्व मुळ कागदपत्रे (Original) जमा करणे आवश्यक आहेत.

२) प्रत्येक विद्यार्थ्याने सर्व विषयांच्या तासांना वक्तीशिरपणे उपस्थित रहावे.

३) प्रत्येक विद्यार्थ्याचे स्वाध्याय (Tutorial) वेळेच्या वेळी पूर्ण लिहून करावेत.

४) महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या सर्व परीक्षांना बसून प्रत्येक विषयात समाधानकारक प्रगती दाखवावी.

५) ७५% पेक्षा कमी उपस्थिती असलेल्या व अंतर्गत परीक्षेस न बसणाऱ्या विद्यार्थ्याला विद्यापीठीय परीक्षेला बसू दिले जाणार नाही व त्यास फी संबंधी कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

६) महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यावर प्रत्येक विद्यार्थ्यास ओळखपत्र (Identity Card) दिले जाते. महाविद्यालयाच्या आवारात विद्यार्थ्याने ओळखपत्र नेहमी गळ्यात घालावे.

७) विद्यार्थ्याने आपल्या तासाखेरीज अन्य वर्गाच्या किंवा इतर विषयांच्या तासांना बसू नये.

८) कोणत्याही प्राध्यापकाशी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी बोलतांना, वागतांना विद्यार्थ्याने आपली मर्यादा सोडू नये.

९) महाविद्यालयाच्या सूचना फलकावर वेळोवेळी लावल्या जाणाऱ्या सर्वप्रकारच्या सूचनांची माहिती घ्यावी

१०) शिकविणे चालु असलेल्या वर्गात आपल्या वागण्याने कोणत्याही प्रकारचा उपद्रव होणार नाही याची प्रत्येक विद्यार्थ्याने खबरदारी व्यक्तीश: घेतली पाहीजे.

११) विद्यार्थ्याचा पोशाख शिष्टमान्य व महाविद्यालयाने ठरवून दिल्याप्रमाणे निटनेटका असावा.

१२) महाविद्यालयात व महाविद्यालयाच्या बाहेर विद्यार्थ्यांचे वर्तन सभ्य असावे.

१३) महाविद्यालयाची मालमत्ता सुरक्षित ठेवण्याविषयी आवारात स्वच्छता राखण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने जागरुक असावे. विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान केल्यास ते विद्यार्थ्याकडून दंडासहित वसूल करण्यात येईल.

१४) महाविद्यालय परिसरातील वृक्ष, वेलींशी मित्रत्वाने वागावे. त्यांना इजा होईल असे वर्तन करु नये.

१५) एखाद्या विद्यार्थ्याचे वर्तन महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे असे प्राचार्यांचे मत झाल्यास अशा विद्यार्थ्यास कोणतेही कारण न सांगता महाविद्यालयातून काढून टाकण्यात येईल.

१६) उत्तर महाराष्ट्रा विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार कोणत्याही कारणास्तव महाविद्यालयाच्या व विद्यापीठाच्या परीक्षेच्या वेळी पत्रकात बदल मागता येणार नाही. योग्य कारणासाठीच विद्यापीठ असे बदल करु शकेल

१७) परीक्षेच्या वेळी बेकायदेशीर वर्तणूक करणाऱ्या विरुध्द कठोर कारवाई केली जाईल.

१८) महाविद्यालयाच्या आवारात कोणत्याही वेळी गैरवर्तणूक करणाऱ्या विरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

१९) प्रत्येक विद्यार्थ्याने ओळखपत्रावर रक्तगट लिहीणे आवश्यक आहे.

२०) महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी मोबाईल आणु नये. अन्यथा दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## * मागासवर्गीय शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना सूचना :-

१) SC/ST/SBC/OBC/NT/DT/BC या संवर्गातून प्रवेश घेतल्यास त्याचा स्कॉलरशीप अर्ज Online भरणे अनिवार्य आहे, ही विद्यार्थ्याची जबाबदारी आहे. अन्यथा सदर विद्यार्थ्याकडून पूर्ण प्रवेश फी + ट्युशन फी घेण्यात येईल. त्यामुळे शिष्यवृत्तीचा अर्ज संपूर्ण कागदपत्रांसह जमा करणे ही विद्यार्थ्याची जबाबदारी राहील.

२) स्कॉलरशीप अर्ज भरतांना वडीलांच्या उत्पन्नाचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

३) वडील हयात नसतील तर मृत्युपत्र जोडणे आवश्यक आहे.

४) F.Y., S.Y., T.Y., B.A./B.Sc साठी कमीतकमी ८०% हजेरी आवश्यक आहे.

५) स्कॉलरशीप अर्जासोबत मार्कशीट झेरॉक्स कॉपी, जातीचा दाखला (झेरॉक्स), उत्पन्नाचा दाखला (मुळपत्र), शाळा सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) इत्यादी जोडावे.

६) आधार कार्ड, मतदान कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स.

## * प्रवेशासाठी लागणारे कागदपत्रे :-

**(अ) प्रथम वर्ष कला व विज्ञान** (F.Y. B.A./B.Sc)

१) मुळ शाळा सोडल्याचा दाखला (Original Living Certificate)

२) L.C. च्या ३ झेरॉक्स सांक्षांकित प्रती.

३) १२ वी किंवा समकक्ष पास झाल्याचे मुळ मार्कशिट (Original marksheet) (पात्रता झाल्यावर मुळ मार्कशिट परत करण्यात येईल)

४) १२ वी किंवा समकक्ष वर्ग पास झाल्याच्या मार्कशिटच्या ३ झेरॉक्स साक्षांकित प्रती.

५) जातीचे प्रमाणपत्र (SC/ST/SBC/OBC/NT/DT अल्पसंख्यांक संवर्गातून प्रवेश घेत असल्यास आवश्यक)

६) अपंग संवर्गातून प्रवेश घेत असल्यास अपंग प्रमाणपत्र.

७) १० वी बोर्ड सर्टिफिकेटची झेरॉक्स प्रत.

८) पासपोर्ट साईजचे रंगीत दोन फोटो, आधार कार्ड, मतदान कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स.

९) प्रत्येक विद्यार्थ्याने Email ID व चालु स्थितीतील मोबाईल नंबर देणे बंधनकारक आहे.

**(ब) द्वितीय वर्ष कला व विज्ञान** (S.Y. B.A./B.Sc)

१) प्रथम वर्ष कला किंवा विज्ञान वर्गाचे पास झाल्याचे/ए.टी.के.टी. चे मार्कशीटची झेरॉक्स साक्षांकित प्रत.

२) जातीचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. (नुतनीकरण केलेली) (SC/ST/SBC/OBC/NT/DT संवर्गातून प्रवेश घेत असल्यास आवश्यक)

३) अपंग संवर्गातून प्रवेश घेत असल्यास अपंग प्रमाणपत्र.

४) पासपोर्ट साईजचे रंगीत दोन फोटो, आधार कार्ड, मतदान कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स.

**(क) तृतीय वर्ष कला व विज्ञान** (T.Y. B.A./B.Sc)

१) कला किंवा विज्ञान प्रथम वर्ष पास असलेल्या विद्यार्थ्यांनाच तृतीय वर्षात प्रवेश मिळेल.

२) प्रथम व द्वितीय वर्ष कला किंवा विज्ञान वर्गाच्या मार्कशीटची झेरॉक्स साक्षांकित प्रत.

३) जातीचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत. (नुतनीकरण केलेली) (SC/ST/SBC/OBC/NT/DT संवर्गातून प्रवेश घेत असल्यास आवश्यक)

४) अपंग संवर्गातून प्रवेश घेत असल्यास अपंग प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत.

५) पासपोर्ट साईजचे रंगीत दोन फोटो, आधार कार्ड, मतदान कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स.

## ❊ विशेष सुचना :-

१) मुळ कागदपत्रे कार्यालयात प्रवेश घेतेवेळी जमा करतांना त्यांच्या आवश्यक त्या झेरॉक्स प्रती काढून ठेवाव्यात. त्याची कोणतीही प्रत विशिष्ट मुदतीनंतर परत मिळणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) एकदा प्रवेश घेतल्यावर विशिष्ट मुदतीनंतर प्रवेश रद्द करावयाचा असल्यास प्रवेश फी कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही.

३) विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम व परिपत्रके सर्वांना लागू राहतील.

**प्रो. संजीव भ. गिरासे**

प्राचार्य

आदिशक्ती धनदाईमाता शिक्षण प्रसारक संस्था धुळेचे

स्व. अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे.

# ✻ फी संबंधी तक्ता ✻

| अ. नं. | तपशील | प्रथम वर्ष | | द्वितीय वर्ष | | तृतीय वर्ष | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कला | विज्ञान | कला | विज्ञान | कला | विज्ञान |
| १ | प्रवेश शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २ | लायब्ररी शुल्क | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ३ | मेडीकल शुल्क | ४० | ४० | -- | -- | -- | -- |
| ४ | जिमखाना शुल्क | १५० | १५० | १५० | १५० | १५० | १५० |
| ५ | टिटोरीयल व चाचणी परीक्षा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| ६ | आपतकालिन व्यवस्थापन शुल्क | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ७ | मॅगेझिन फी | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| ८ | लॅबोरेटरी फी | -- | १००० | -- | ११०० | -- | ३००० |
| ९ | महाविद्यालय विकास निधी | ८० | ८० | ८० | ८० | ८० | ८० |
| १० | विद्यार्थी उपक्रम शुल्क | ४० | ४० | ४० | ४० | ४० | ४० |
| ११ | गरीब विद्यार्थी सहाय्यता निधी | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| १२ | अश्वमेघ क्रिडा शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| १३ | संगणकीकरण शुल्क | २० | २० | २० | २० | २० | २० |
| १४ | विद्यार्थी समुह विमा | २० | २० | २० | २० | २० | २० |
| १५ | एम.के.सी.एल. शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| १६ | स्नेहसंमेलन शुल्क | ६० | ६० | ६० | ६० | ६० | ६० |
| १७ | ओळखपत्र शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| १८ | माजी विद्यार्थी संघ शुल्क | ३० | ३० | ३० | ३० | ३० | ३० |
| १९ | व्य.विकास व व्य.रो.मार्गदर्शन शुल्क | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २० | किरकोळ शुल्क | १५० | १०० | १५० | १०० | १५० | १०० |
| २१ | पात्रता फी | १०० | १०० | -- | -- | -- | -- |
| २२ | युवा रंग फी | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २३ | सामान्यज्ञान शुल्क | -- | -- | १०० | १०० | -- | -- |
| २४ | प्रशिक्षण आणि नियुक्ती | २० | २० | २० | २० | ५० | ५० |
| २५ | ध्वज निधी | १० | १० | १० | १० | १० | १० |
| २६ | पर्यावरण शुल्क | १५० | १५० | -- | -- | -- | -- |
| २७ | हरीत उर्जा निधी | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |
| २८ | अर्ज फी | ५० | ५० | ५० | ५० | ५० | ५० |
| २९ | एन.एस.एस. सेल फायनान्स | १० | १० | १० | १० | १० | १० |
| ३० | शिक्षण शुल्क | ८०० | ८०० | ८०० | ८०० | ८०० | २५०० |
| | एकुण फी | २४७० | ३४२० | २३१० | ३३३० | २२१० | ६८६० |

# * प्राध्यापक वृंद *

| अ. नं. | प्राध्यापकांचे नांव | हुद्दा | विभाग | शिक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रो. डॉ. संजीव बी. गिरासे | प्राचार्य | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. पीएच.डी. |
| २ | प्रा. डॉ. एस. बी. पाटील | उपप्राचार्य | भूगोल विभाग प्रमुख | एम.ए.बी.एड्. पीएच.डी. |
| ३ | प्रा. डॉ. व्ही. एस. आढावे | प्राध्यापक | मराठी विभाग प्रमुख | एम.ए.बी.एड्. पीएच.डी.सेट. |
| ४ | प्रा. डॉ. व्ही. टी. पवार | सहा. प्राध्यापक | हिंदी विभाग प्रमुख | एम.ए.बी.एड्.एम.फिल,पीएच.डी. |
| ५ | प्रा. डॉ. आर. सी. अहिरे | सहा. प्राध्यापक | भूगोल | एम.ए.बी.एड्. एम.फिल,नेट |
| ६ | प्रा. डी. बी. भामरे | सहा. प्राध्यापक | अर्थशास्त्र | एम.ए.बी.एड्. |
| ७ | प्रा. व्ही. के. साळुंखे | सहा. प्राध्यापक | इतिहास | एम.ए. एम.फिल |
| ८ | प्रा. डॉ. बी. टी. मोताळे | सहयोगी प्राध्यापक | राज्यशास्त्र | एम.ए.बी.एड्. नेट, पीएच.डी. |
| ९ | प्रा. डॉ. एच. डी. पाटील | सहयोगी प्राध्यापक | इंग्रजी | एम.ए. एम.फिल, सेट, पीएच.डी. |
| १० | प्रा. बी. एन. काकडे | सहा. प्राध्यापक | पदार्थ विज्ञान | एम.एस्सी. बी.एड्. |
| ११ | प्रा. डॉ. एम. बी. देवरे | सहयोगी प्राध्यापक | मराठी | एम.ए.बी.एड्. नेट, पीएच.डी. |
| १२ | प्रा. व्ही. बी. जाधव | ग्रंथपाल | ग्रंथालयशास्त्र | एम.लिब. एम. फिल |
| १३ | प्रा. डॉ. जे. पी. तोरवणे | शा. शि. संचालक | क्रीडा | एम.एस्सी. एम.पीएड,एम.फिल |
| १४ | प्रा. डॉ. एस. एस. नांद्रे | सहयोगी प्राध्यापक | रसायनशास्त्र वि. प्र. | एम.एस्सी.एम.फिल.पीएच.डी. |
| १५ | प्रा. एच. एस. नांद्रे | सहा. प्राध्यापक | भूगोल | एम.ए. नेट |
| १६ | प्रा. यु. बी. गवई | सहा. प्राध्यापक | रसायनशास्त्र | एम.एस्सी. नेट |
| १७ | प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे | सहा. प्राध्यापक | वनस्पतीशास्त्र | एम.एस्सी. पीएच.डी. |

# * शिक्षकेतर कर्मचारी वृंद *

| अ. नं. | कर्मचाऱ्याचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. पवार अरुण रामराव | मुख्य लिपीक |
| २ | श्री. देवरे घनश्याम उत्तमराव | कनिष्ठ लिपीक |
| ३ | श्री. मोरे प्रविण मुरलीधर | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ४ | श्री. देवरे राजेंद्र दौलत | प्रयोगशाळा परिचर |
| ५ | डॉ. चित्तम ऋषिकेश सुभाष | प्रयोगशाळा परिचर |
| ६ | श्री. विसपुते शरद दिगंबर | प्रयोगशाळा परिचर |
| ७ | श्री. देवरे जितेंद्र लोटन | प्रयोगशाळा परिचर |
| ८ | श्री. जाधव रत्नाकर आनंदा | शिपाई |
| ९ | श्री. बहिरम संजय शिवाजी | शिपाई |
| १० | श्री. मोहिते बापू देवमन | शिपाई |
| ११ | श्री. शेवाळे रामदास निंबा | शिपाई |

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

## क. ब. चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

## विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी अभ्यासेतर उपक्रम

### * विद्यार्थ्यांसाठी वैयक्तीक विकासाच्या योजना :-

१) मा. कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजना.
२) कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना.
३) विद्यार्थी शैक्षणिक प्रशाळा – विभाग विद्यार्थी दत्तक योजना.
४) मा. कुलगुरु वैद्यकीय निधी योजना.
५) विद्यार्थी सुरक्षा विमा योजना.
६) एकलव्य विद्याधन योजना.

### * महाविद्यालय स्तरावर राबविले जाणारे उपक्रम :-

१) विद्यार्थी परिषद निवड.
२) महाविद्यालयील नियतकालिक स्पर्धा.
३) जागतिक तापमान वाढ कार्यशाळा.
४) रोजगार व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा.
५) युवती सभा/कार्यशाळा–स्वयंसिध्दा अभियान / व्यक्तिमत्व विकास सेल.

### * विद्यापीठस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्रे/परिसंवाद/कृतीसत्रे :-

१) साहस कार्यशाळा
२) युवा संसद कार्यशाळा
३) जिल्हास्तरीय मैत्री कार्यशाळा
४) नाट्य अभिवाचन कार्यशाळा
५) सुत्रसंचालन कौशल्य कार्यशाळा
६) भाषण कौशल्य विकास कार्यशाळा
७) ताणतणाव मुक्त परीक्षा कार्यशाळा
८) पोवाडा गायन कौशल्य कार्यशाळा
९) पथनाट्य कौशल्य विकास कार्यशाळा
१०) विद्यार्थी व्यक्तिमत्व कौशल्य विकास कार्यशाळा
११) आपत्कालिन समायोजन व प्रशिक्षण कार्यशाळा

१२) श्रमसंस्कार, व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा

१३) आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा विकास कार्यशाळा

१४) महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद सचिव (णठ) नेतृत्व विकास कार्यशाळा

**※ विद्यापीठस्तरीय स्पर्धा :-**

१) कथाकथन स्पर्धा

२) काव्यवाचन स्पर्धा

३) युवारंग– युवक महोत्सव

४) उमवि करंडक एकांकिका स्पर्धा

५) आविष्का (जिल्हास्तरीय/विद्यापीठस्तरीय)

६) कै. अभ्यंकर नाट्य व भावगीत गायन स्पर्धा

७) आंतर महाविद्यालयीन अभिरुप न्यायालय स्पर्धा

८) कै. भाईसाहेब वाय. एस. महाजन विद्यार्थिनींसाठी वक्तृत्व स्पर्धा

९) कै. भास्कर सबनिस वाणिज्य प्रश्न मंजुषा व सादरीकरण स्पर्धा

**※ विद्यापीठस्तरीय सन्मान योजना :-**

१) युवा संशोधक पुरस्कार

२) बाल वैज्ञानिक पुरस्कार (प्रस्तावित)

३) प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी पुरस्कार.

**※ अधिक माहितीसाठी संपर्क ※**

संचालक, विद्यार्थी विकास विभाग
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
फोन नं. : ०२५७–२२५७४१८, ४१९, ९४२३१८५०७९
Website : www.nmu.ac.in email : dir-sw@nmu.ac.in

**संचालक** **उपाध्यक्ष** **कुलगुरू**
विद्यापीठ विद्यार्थी विकास सल्लागार समिती

| **डॉ. व्ही. के. साळुंखे** | **डॉ. यु. बी. गवई** | **प्रो. संजीव बी. गिरासे** |
|---|---|---|
| समन्वयक | सहा. समन्वयक | प्राचार्य |
| मो. ९४२१७९९७९५ | मो. ९६२३००८४०६ | मो. ९३२५५३४५११ |

महाविद्यालय विद्यार्थी विकास समिती

# College Song

*Dandai, the name of hills n an ancient village*
*It is also the name of Goddess and our college*

*Dandai village nestled in the Dandai hills*
*A divine touch of goddess each one feels*

*Students come and take away knowledge*
*The trees in the garden look at the foliage*

*The teachers teach, the students learn calm and quiet*
*The flowers and birds also accompany, a pleasant sight*

*The birds, students and the trees are happy*
*It runs smoothly though the hills are sloppy*

*Smelly, herbal and medicinal plants are there*
*The towering Dandai all the times looks over*

*Thus, all the elements mutually go hand in hand*
*Come and behold ! This is our an excellent brand.*

(Ex. Prin. (Dr.) S.R. Patil)





प्रति,

----------------------------------------

----------------------------------------

----------------------------------------

✲ प्रेषक ✲

प्राचार्य,

आदिशक्ती धनदाई माता शिक्षण प्रसारक संस्थेचे,

**स्वर्गीय अण्णासाहेब आर. डी. देवरे कला व**
**विज्ञान महाविद्यालय, म्हसदी, ता. साक्री**

म्हसदी, ता. साक्री, जि. धुळे. मो. ७५८८०५३१६६

Website : www.admsps.org
Email : principal.admsps@yahoo.co.in